विनंती बदली
कार्यालय अधिक्षक, गट-ब (राजपत्रित)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग, मंत्रालय,
शासन आदेश क्रमांक : एमएफएस-०५.२६/प्र.क्र.४७ / वने-८.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ९ जून, २०२६

शासन आदेश :-

शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) (१) व कलम ४ (५) मधील तरतुदीनुसार खालील तक्त्यात नमूद केलेल्या कार्यालय अधिक्षकं, गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांची प्रशासकीय कारणास्तव त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.३ मध्ये नमूद केलेल्या पदावरून स्तंभ क्र.४ येथे दर्शविलेल्या पदावर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | कार्यरत ठिकाण | बदलीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | श्री.रविंद्र सुकारे | कार्यालय अधीक्षक, उप वनसंरक्षक (सामाजीक वनीकरण), नागपूर | कार्यालय अधिक्षक, कक्ष-१०, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), नागपूर या श्री.नितीन झाडे यांच्या नियतकालिक बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर |
| २. | श्री.संतोष काळे | कार्यालय अधीक्षक, उप वनसंरक्षक, सोलापूर वन विभाग | कार्यालय अधीक्षक, वनसंरक्षक (सामाजीक वनीकरण), पुणे या रिक्त पदावर |

२. सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील. सदरहू आदेशान्वये बदलीने पदस्थापना दिलेल्या अधिकाऱ्यास नियंत्रक अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कार्यरत पदावरून तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच, संबंधित अधिकाऱ्याला नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले, याबाबतची माहिती संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी शासनास कळवावी.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमानुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी अन्यथा या पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा "अकार्यदिन" (dies-non) म्हणून गणला जाईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करू नये. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

५. सदरहू आदेशानुसार संबधित अधिकारी तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लघंन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

9.6.2026

(निकेता पांडे)
उप सचिव, महसूल व वन विभाग

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७) मुख्य वनसंरक्षक /वनसंरक्षक / उप वनसंरक्षक (सर्व)
८) महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र -१/२, मुंबई/ नागपूर
९) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व)
११) अपर मुख्य सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक
१२) संबंधित अधिकारी (प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म.रा.नागपूर यांचे मार्फत)
१३) निवड नस्ती (वने-८ कार्यासन).